Vol 7 Issue 2 Nov 2017

ISSN No : 2249-894X

Monthly Multidisciplinary Research Journal

# Review Of Research Journal

Chief Editors

**Ashok Yakkaldevi**
**A R Burla College, India**

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

**Welcome to Review Of Research**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2249-894X**

Review Of Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

**Regional Editor**

Dr. T. Manichander

Sanjeev Kumar Mishra

***Advisory Board***

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Fabricio Moraes de AlmeidaFederal University of Rondonia, Brazil

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Xiaohua Yang
University of San Francisco, San Francisco

Karina Xavier
Massachusetts Institute of Technology (MIT), USA

May Hongmei Gao
Kennesaw State University, USA

Marc Fetscherin
Rollins College, USA

Liu Chen
Beijing Foreign Studies University, China

Mabel Miao
Center for China and Globalization, China

Ruth Wolf
University Walla, Israel

Jie Hao
University of Sydney, Australia

Pei-Shan Kao Andrea
University of Essex, United Kingdom

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Ilie Pintea
Spiru Haret University, Romania

Mahdi Moharrampour
Islamic Azad University buinzahra Branch, Qazvin, Iran

Titus Pop
PhD, Partium Christian University, Oradea,
Romania

J. K. VIJAYAKUMAR
King Abdullah University of Science & Technology,Saudi Arabia.

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher
Faculty of Philosophy and Socio-Political Sciences
Al. I. Cuza University, Iasi

REZA KAFIPOUR
Shiraz University of Medical Sciences
Shiraz, Iran

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

Awadhesh Kumar Shirotriya

Nimita Khanna
Director, Isara Institute of Management, New Delhi

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

P. Malyadri
Government Degree College, Tandur, A.P.

S. D. Sindkhedkar
PSGVP Mandal's Arts, Science and Commerce College, Shahada [ M.S. ]

Anurag Misra
DBS College, Kanpur

C. D. Balaji
Panimalar Engineering College, Chennai

Bhavana vivek patole
PhD, Elphinstone college mumbai-32

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut (U.P.)

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Sonal Singh
Vikram University, Ujjain

Jayashree Patil-Dake
MBA Department of Badruka College Commerce and Arts Post Graduate Centre (BCCAPGC),Kachiguda, Hyderabad

Maj. Dr. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

AR. SARAVANAKUMARALAGAPPA UNIVERSITY, KARAIKUDI,TN

V.MAHALAKSHMI
Dean, Panimalar Engineering College

S.KANNAN
Ph.D , Annamalai University

Kanwar Dinesh Singh
Dept.English, Government Postgraduate College , solan

More.........

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.oldror.lbp.world**

REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 2 | NOVEMBER - 2017

# ओलिताखालील क्षेत्र आणि ग्रामीण वस्तीचे वितरण : सोलापूर जिल्हा विशेष अभ्यास.

डॉ. हणमंत लक्ष्मण नारायणकर
चंद्रभागाबाई यलगुलवार कनिष्ठ महाविद्यालय , सोलापूर.



सोलापूर जिल्हयात सिंचनासाठी विहिर, कूपनलिका, धरण, तलाव व कालवे अशा साधनांचा उपयोग केला जातो. येथे जलसिंचनाचा विकास झालेला नाही असे नाही, पण सध्याच्या सोयी अपु-या व सर्वत्र सारख्या प्रमाणात उपलब्ध नाहीत. या घटकांचा परिणाम ग्रामीण वस्तीच्या वितरणावर होतो. सोलापूर जिल्हयातील ओलिताखालील क्षेत्र आणि ग्रामीण वस्तीचे वितरण या संबंधीचा परस्पर अभ्यास या शोध निबंधात केला आहे.

**संज्ञा :-** ग्रामीण, वस्ती, सिंचन, क्षेत्र, घनता व वितरण या संज्ञांचा अभ्यास करण्यात आला आहे.

## प्रस्तावना :-

भारत हा शेतीप्रधान देश आहे. भारतातील शेतकरी अन्नधान्याच्या उत्पादनाकरीता शेताजवळ किंवा शेतात राहतात. त्यामुळे भारतातील बहुतांशी ग्रामीण वस्त्या शेती क्षेत्रात आढळतात. या ग्रामीण वस्त्यांचे मुख्य कार्य अन्नधान्य उत्पादन करणे, शेतीच्या मशागतीची सर्व कामे व्हावीत व पाणीपुरवठयाची सोय यादृष्टिने शेताजवळच राहणे पसंत करतात. त्यामुळे ग्रामीण वस्त्यातील बहुतांशी लोक शेती व्यवसायात गुंतलेले असतात. शेती मुख्यत्वे मोसमी पर्जन्यावर अवलंबून असून मोसमी पर्जन्य अनियमित व अनिश्चित स्वरूपाचे आहे. यामुळे भारतातील शेती अयशस्वी ठरली आहे. या शेतीस वेळेवर आणि पुरेसा पाणी पुरवठा झाला तर शेतीचा अधिक विकास होऊ शकतो. यासाठी कृत्रिम पाणी पुरवठयाची नितांत गरज ओळखून प्राचीन काळापासून भारतात जलसिंचनाची साधने आस्तित्वात आहेत.

भारतीय संस्कृतीचा विकास मुख्यत्वे नद्यांच्या खो-यातच झाला. यावरून त्यावेळी जलसिंचनाला महत्व होते हे स्पष्ट दिसून येते. ज्या भागात जलसिंचन सुविधाच्या माध्यमातून जमिन ओलिताखाली आणली आहे. त्या भागात ग्रामीण वस्तीचे स्वरूप व कार्य बदलत असल्याचे दिसते. ग्रामीण वस्तीचा जसजसा विकास होतो तसतसे तिचे स्वरूपही बदलत जाते. वस्तीचा केवळ आकारच बदलत नाही, तर ग्रामीण वस्तीचे विखुरलेल्या स्वरूपापासून ते दाट वस्तीच्या स्वरूपात रूतांतर होते. महाराष्ट्रातील 85% शेती पडणा-या मोसमी पर्जन्यावर अवलंबून आहे. एका बाजूला दरवर्षी मिळणारी जलसंपत्ती जरी कायम राहिली असली तरी भौगोलिक परिस्थितीनुसार, काही ठिकाणी पर्जन्याअभावी कोरडया दुष्काळाला तोंड द्यावे लागते, तर काही ठिकाणी अधिक पर्जन्यामुळे ओला दुष्काळही पाहायला मिळतो. अशीच स्थिती पश्चिम महाराष्ट्रातील पर्जन्य छायेच्या प्रदेशात जास्त आहे. त्यासाठी सिंचनाची आवश्यकता आहे. सिंचन म्हणजे पर्जन्यवृष्टी ज्या काळात होत नाही त्या काळात विविध माध्यमाच्या सहाय्याने जमीनीला पाण्याचा पुरवठा करणे व जमिन ओलिताखाली आणणे होय.

## उद्देश :-

1. सोलापूर जिल्यातील भौगोलिक परिस्थितीचा अभ्यास करणे.
2. जिल्हयातील सिंचनाखालील क्षेत्राचा अभ्यास करणे.
3. जिल्यातील सिंचन क्षेत्र आणि ग्रामीण वस्तीच्या वितरणाचा संबंध अभ्यासणे.

## संशोधन पध्दती :-

अनूसूचीचा वापर करून प्रस्तुत शोध निबंध व्दितीय स्वरूपाच्या आकडेवारिनुसार संशोधन अभ्यास करण्यात आला आहे. ही माहिती शासनाच्या विविध सांख्यिकीय विभागातील दस्ताऐवज, सामाजिक व आर्थिक समालोचन, गॅजीटर्स, वेबसाईट्, भूमीअभिलेख कार्यालय, भूस्थलदर्शक नकाशा इ. च्या साहयाने संकलीत केलेली आहे. उपलब्ध झालेल्या माहितीवर योग्य संस्करण करून त्या माहितीचे विवेचन व विश्लेषण केले आहे.

## अभ्यास पध्दती :-

सिंचनाखालील जमीनीची टक्केवारी काढण्यासाठी खालील सूत्राचा वापर केला आहे.

$$\text{सिंचनाखालील जमिनीची टक्केवारी} = \frac{\text{तालुक्यातील सिंचनाखालील जमिन}}{\text{तालुक्याचे क्षेत्रफळ (चौ. कि. मी)}} \times 100$$

## अभ्यास क्षेत्र :-


सोलापूर जिल्हा महाराष्ट्राच्या आग्नेय कोपयात वसलेला असून त्याचे भौगोलिक स्थान व विस्तार **17°.10'** उत्तर ते **18°.32'** उत्तर अक्षांश व **74°.42'** पूर्व ते **76°.15'** पूर्व रेखांशामध्ये स्थित आहे. जिल्हयाच्या उत्तरेस अहमदनगर व उस्मानाबाद हे जिल्हे पूर्वेस उस्मानाबाद हा जिल्हा दक्षिणेस सांगली

 VOLUME - 7 | ISSUE - 2 |NOVEMBER - 2017

जिल्हा व कर्नाटक राज्य आणि पश्चिमेस सातारा व पुणे हे जिल्हे आहेत . या जिल्हयात एकूण **11** तालुके आहेत . या स्थळाची समुद्र सपाटीपासूनची उंची **540** मीटर असून दख्खन पठारावर भीमा नदीच्या खो-यात वसलेले आहे . या जिल्हयाचे एकूण भौगोलिक क्षेत्रफळ **1487843** हेक्टर आहे . सन **2011** च्या जनगणनेनुसार **43 . 17** लाख लोकसंख्या आहे .

## अभ्यास मर्यादा :-

प्रस्तुत शोध निबंधामध्ये सोलापूर जिल्हयातील ग्रामीण वस्तीच्या आकडेवारीचा वापर करण्यात आला आहे .




## • ग्रामीण वस्तीतील राहत्या कुटुंबांची संख्या व लोकसंख्या :-

सोलापूर जिल्हयातील ग्रामीण वस्तीत प्रशस्त बंगल्यापासून झोपडपट्टी पर्यत घरांचे विविध प्रकार आढळतात . कारण पावसाचे प्रमाण कमी असल्यामुळे व स्थानीक साहित्याचा वापर करून बांधलेली आहेत . तर काही घरे पञ्याची, कौलाची व स्लॅबची आहेत . **2011** या वर्षीच्या आकडेवारीनुसार सोलापूर जिल्हयातील ग्रामीण वस्तीत राहत्या कुटुंवाची संख्या **593560** होती आणि या कुटुंबामध्ये **2918665** लोकसंख्या होती .

## • सिंचन सुविधा :-

सोलापूर जिल्हयात **12** नद्या असून त्यांची लांबी **766** कि . मी . आहे . भिमा ही प्रमुख नदी करमाळा, मोहोळ, माढा, द . सोलापूर, मंगळवेढा, पंढरपूर व माळशिरस तालुक्यातून वाहते . भिमा नदीची जिल्हयातील एकूण लांबी **289** कि . मी . आहे . भीमा नदीच्या उजवीकडील भागात निरा नदी माळशिरस तालुक्यातून वाहते तिची लांबी **75** कि . मी . व माण नदी मंगळवेढा, व सांगोला तालुक्यातून वाहते तिची लांबी **78** कि . मी . आहे . आणि डाव्या भागात सिना नदी करमाळा, मोहोळ, माढा, द . सोलापूर, व उ . सोलापूर तालुक्यातून **128** कि . मी . ,भोगावती नदी वार्शी, मोहोळ तालुक्यातून **33** कि . मी . ,बोरी नदी अक्कलकोट तालुका **41** कि . मी . , हरणा नदी अक्कलकोट व द . सोलापूर तालुका **24** कि . मी . ,नागझरी नदी बार्शी तालुका **33** कि . मी . ,सांगोला तालुका अप्रुका नदी **26** कि . मी . , कोरडा नदी **22** कि . मी . , वेलवण नदी **10** कि . मी . व रामघाट नदी **41** कि . मी . वाहते . या भीमा नदीच्या सर्व उपनद्या आहेत . सन **2012 – 13** नुसार जिल्हयात भीमा व वीर धरण हे मोठे पाटबंधारे प्रकल्प कार्यरत असून याबरोबर जिल्हयात **11** मध्यम प्रकल्प, **38** लघु सिंचन प्रकल्प, **1153** पाझर तलाव, **723** कोल्हापूर पध्दतीचे बंधारे पूर्ण झालेले आहेत . या सिंचन सोयीचा उपयोग ग्रामीण वस्तीचे वितरणावर झालेला आहे .

## विषय विवेचन :-


तक्ता क्रमांक 1 च्या आकडेवारीनुसार सोलापूर जिल्हयातील विविध साधनाखालील सिंचन क्षेत्र आणि सिंचन क्षेत्राची टक्केवारी तालुकानिहाय सारखी नाही . मोहोळ तालुक्याची सिंचन क्षेत्र टक्केवारी 15 . 17 असून ती सर्वात कमी आहे . करमाळा तालुका सिंचन क्षेत्र 19 . 05%, माढा 22 . 18%, बार्शी 25 . 18%, उ . सोलापूर 21 . 75%, पंढरपूर 22 . 36%, माळशिरस 29 . 11%, मंगळवेढा 41 . 34%, दक्षिण सोलापूर 20 . 21%, अक्कलकोट 23 . 91%, आणि सांगोला तालुका सिंचन क्षेत्र 42 . 10% असून ते सर्वात जास्त आहे . वरील सर्व सिंचन क्षेत्राचा ग्रामीण वस्तीच्या वितरणावर परिणाम झालेला दिसून येतो .

### तक्ता क्रमांक 1
### सोलापूर जिल्हा तालुकानिहाय सिंचन क्षेत्र व लागवडी खालील क्षेत्र
### (2012-13)

| अ . क्र . | तालुका | सिंचना खालील स्थूल क्षेत्र (हेक्टर) | एकूण लागवडी खालील स्थूल क्षेत्र (हेक्टर) | सिंचनाखालील क्षेत्राची लागवडी खालील क्षेत्राशी टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| 1 | करमाळा | 23143 | 121509 | 19.05 |
| 2 | माढा | 25424 | 114622 | 22.18 |
| 3 | बार्शी | 31932 | 126811 | 25.18 |
| 4 | उ . सोलापूर | 12227 | 56218 | 21.75 |
| 5 | मोहोळ | 14316 | 94368 | 15.17 |
| 6 | पंढरपूर | 24185 | 108149 | 22.36 |
| 7 | माळशिरस | 28606 | 98260 | 29.11 |
| 8 | सांगोला | 28357 | 67359 | 42.10 |
| 9 | मंगळवेढा | 29270 | 70798 | 41.34 |
| 10 | द . सोलापूर | 19306 | 95524 | 20.21 |
| 11 | अक्कलकोट | 22710 | 94978 | 23.91 |
| | एकूण | 259476 | 1048596 | 24.75 |

संदर्भ : जिल्हा अधिक्षक भूमी अधिक्षक कार्यालय,सोलापूर .

### आकृती क्रमांक 1




तक्ता क्रमांक 2 च्या सांख्येकिय आकडेवारीनुसार सोलापूर जिल्हयातील 20 . 00% पेक्षा कमी सिंचनाखालील जमिनीच्या विभागाने 19 . 58% क्षेत्र व्यापलेले आहे . या विभागात ग्रामीण वस्तीची टक्केवारी 19 . 67% असून मध्यम आहे . या विभागात ग्रामीण वस्तीची घनता दर 100 चौ . कि . मीटर मागे 7 . 79६ असल्याचे आढळते . यामध्ये करमाळा व मोहोळ तालुक्याचा समावेश होतो . या तालुक्यात सिंचनाची साधने कमी प्रमाणात आहेत . तसेच या विभागात ग्रामीण लोकसख्येची घनता 174 एवढी आहे .

### तक्ता क्रमांक 2

सोलापूर जिल्हा सिंचन क्षेत्र, ग्रामीण वस्तीची संख्या व लोकसंख्येची घनता
(2012-13)

| अ.क्र. | सिंचना खालील | | | ग्रामीण वस्तीची | | | ग्रामीण लोकसंख्येची घनता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | जमिनीचे विभाग | व्याप्त क्षेत्र चौ.कि.मी | व्याप्त क्षेत्र टक्केवारी | संख्या | टक्केवारी | घनता दर 100 चौ.कि.मी | |
| 1 | 20% पेक्षा कमी | 2913 | 19.58 | 227 | 19.67 | 7.79 | 174 |
| 2 | 20% ते 40% | 9230 | 62.03 | 744 | 64.47 | 8.06 | 210 |
| 3 | 40% पेक्षा जास्त | 2736 | 18.39 | 183 | 15.86 | 6.69 | 173 |
| एकूण जिल्हा | | 14879 | 100 | 1154 | 100 | 7.76 | 196 |

संदर्भ : जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन सोलापूर जिल्हा,सोलापूर. 2012-13

सोलापूर जिल्हयातील 20% ते 40% सिंचनाखालील जमिनीच्या विभागाने सर्वात जास्त 62.03% क्षेत्र व्यापलेले आहे. या विभागात ग्रामीण वस्तीची टक्केवारी 64.47% असून तुलनात्मकदृष्टया सर्वात जास्त आहे. या विभागात ग्रामीण वस्तीची घनता दर 100 चौ.कि.मीटर मागे 8.06% असल्याचे आढळते. यामध्ये माढा, बार्शी, उ.सोलापूर, पंढरपूर, माळशिरस, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट या तालुक्याचा समावेश होतो. या तालुक्यात सिंचनाची साधने जास्त प्रमाणात आहेत. तसेच या विभागात ग्रामीण लोकसख्येची घनता 210 एवढी आहे. सोलापूर जिल्हयातील एकूण ऊस उत्पादनापैकी सर्वात जास्त उत्पादन माढा तालुक्यातून घेण्यात आलेले आहे. या खालोखाल अक्कलकोट व पंढरपूर तालुक्याचा समावेश होतो. या तिन्ही तालुक्यात जलसिंचणाच्या सुविधा उपलब्ध असल्यामुळे ऊसाचे उत्पादन जास्त झाल्याचे दिसून येते.

सोलापूर जिल्हयातील 40.00% पेक्षा जास्त सिंचनाखालील जमिनीच्या विभागाने 18.39% क्षेत्र व्यापलेले आहे. या विभागात ग्रामीण वस्तीची टक्केवारी 15.86% असून तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी आहे. या विभागात ग्रामीण वस्तीची घनता दर 100 चौ.कि.मीटर मागे 6.69% असल्याचे आढळते. यामध्ये सांगोला व मंगळवेढा तालुक्याचा समावेश होतो. या तालुक्यात सिंचनाची साधने कमी प्रमाणात आहेत. तसेच या विभागात ग्रामीण लोकसख्येची घनता 173 एवढी आहे.

करमाळा व दक्षिण सोलापूर तालुक्यात दर हेक्टरी उत्पादन कमी असल्यामुळे उसाचे उत्पादन कमी झाल्याचे दिसून येते. एकंदरीत करमाळा व द.सोलापूर ही दोन तालुके वगळता संपूर्ण जिल्हयात ऊसाचे दर हेक्टरी उत्पादन 85 मे.टन असल्यामुळे ऊसाच्या उत्पादनात वाढ झालेली दिसून येते.

## निष्कर्ष :-

1. सोलापूर जिल्हयातील 20.00% पेक्षा कमी सिंचनाखालील जमिनीच्या विभागाने 19.58% क्षेत्र व्यापलेले आहे. या विभागात ग्रामीण वस्तीची टक्केवारी 19.67% असून मध्यम आहे. या विभागात ग्रामीण वस्तीची घनता दर 100 चौ.कि.मीटर मागे 7.79% असल्याचे आढळते.
2. जिल्हयातील 20% ते 40% सिंचनाखालील जमिनीच्या विभागाने सर्वात जास्त 62.03% क्षेत्र व्यापलेले आहे. या विभागात ग्रामीण वस्तीची टक्केवारी 64.47% असून तुलनात्मकदृष्टया सर्वात जास्त आहे. या विभागात ग्रामीण वस्तीची घनता दर 100 चौ.कि.मीटर मागे 8.06% असल्याचे आढळते.
3. सोलापूर जिल्हयातील 40.00% पेक्षा जास्त सिंचनाखालील जमिनीच्या विभागाने 18.39% क्षेत्र व्यापलेले आहे. या विभागात ग्रामीण वस्तीची टक्केवारी 15.86% असून तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी आहे. या विभागात ग्रामीण वस्तीची घनता दर 100 चौ.कि.मीटर मागे 6.69% असल्याचे आढळते.

## संदर्भ ग्रंथ :-

1. संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्र - प्रदीप आगलावे.
2. महाराष्ट्रातील जिल्हे - सोलापूर.
3. कृषी भूगोल (1991) - के.ए.खतीब.
4. महाराष्ट्र (2006) - संतोष दास्ताने.
5. महाराष्ट्राच्या जलसंपत्तीचे नियोजन (2007) - विलासराव साळुंखे व इतर.
6. जिल्हा जनगणना निर्देश ग्रंथ - सोलापूर जिल्हा (2011).
7. जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन - सोलापूर जिल्हा. (2012-13)
8. लोकसंख्या व वस्ती भूगोल (2015) - डॉ.एच.एल.नारायणकर व इतर.
9. नकाशे - 1
10. Gazetteer of India – Solapur District (Revised Edition) Govt.Publication.

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal
# For All Subjects

Dear Sir/Mam,
We invite unpublished Research Paper,Summary of Research Project,Theses,Books and Books Review for publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- Directory Of Research Journal Indexing
- International Scientific Journal Consortium Scientific
- OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- DOAJ
- EBSCO
- Crossref DOI
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Review Of Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-
413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com